।। शिक्षण हाच धर्म ।।
Walchand College of Arts and Science SOLAPUR
Estd. 1962
Shri Aillak Pannalal Digambar Jain Pathashala's
*Jain Minority Institute*
**Walchand College of Arts and Science, Solapur**
**Autonomous College**
(Affiliated to P.A.H. Solapur University, Solapur)
Seth Walchand Hirachand Marg, Ashok Chowk, **SOLAPUR** - 413 006. (Maharashtra) India
**Contact No.** Office- 0217-2651863, Principal- 0217-2651185
**Email :** principalwcas@yahoo.co.in, principalwcas@gmail.com **Website :** www.wcassolapur.org
Reaccredited by **NAAC** with **'A'** Grade (3rd Cycle) • **CPE Status** UGC-New Delhi
• Arts
• M.S.W.
• Science
• Biotechnology
• YCMOU Center
BJMC, MBA

Ref. No: Wcas/Exam /2025-26/14 **Date**: 29/05/ 2025

## परीक्षा निकाल जाहीर झालेबाबत सूचना

खालील पदवी आणि पदव्युत्तर विभागातील अभ्यासक्रमाचे मार्च/एप्रिल-२०२५ मधील **U.G.(NEP/Non-NEP)** परीक्षेचे **सेमिस्टर- १ ते ६ आणि P.G. .(NEP/Non-NEP) १ ते ४** चे निकाल महाविद्यालयाच्या https://wcs-results.contineo.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. निकाल जाहीर झाल्या पासून पुढील दहा (१०) दिवसात निकाला संदर्भातील त्रुटींबाबत तसेच Revaluation, Photocopy चे अर्ज स्वीकारले जातील. यानंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची कृपया संबंधितानी नोंद घ्यावी. सविस्तर माहितीसाठी सोबत जोडलेल्या सूचना पहाव्यात.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | निकाल जाहीर झालेली तारीख |
|---|---|---|
| 01 | B.A. | 29/05/2025 |
| 02 | B.Sc. | 29/05/2025 |
| 03 | B.Sc. Biotechnology | 29/05/2025 |
| 04 | M.A. Marathi | 29/05/2025 |
| 05 | M.A. Hindi | 29/05/2025 |
| 06 | M.A. English | 29/05/2025 |
| 07 | M.A. Economics | 29/05/2025 |
| 08 | M.A. Political Science | 29/05/2025 |
| 09 | M.A. Geography | 29/05/2025 |
| 10 | M.Sc. Biotechnology | 29/05/2025 |
| 11 | M.Sc. Bioinformatics | 29/05/2025 |
| 12 | M.Sc. Genetics | 29/05/2025 |
| 13 | M.Sc. Inorganic Chemistry | 29/05/2025 |
| 14 | M.Sc. Zoology | 29/05/2025 |
| 15 | M.S.W | 29/05/2025 |

(प्रा. डॉ. एस. पी. गायकवाड)
**परीक्षा नियंत्रक**

(डॉ. एस. व्ही .कोटी)
**प्राचार्य**

EXAM SECTION

प्रत:०१. कार्यालय
०२ संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

# परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सूचना

१. ज्या विद्यार्थ्यांची Copy Case असेल अशा विद्यार्थ्यांचे निकाल हे परीक्षा प्रमाद समितीकडून आलेल्या अहवालानुसार जाहीर करण्यात आले आहेत. यासंदर्भातील निर्णय संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात आला आहे.

२. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल संकेतस्थळावर घोषित झालेले आहेत परंतू त्यामध्ये काही त्रुटी असतील उदा. RR/ABS/EHB अशा विद्यार्थ्यांनी निकालामध्ये त्रुटी असल्याबद्दल **विहित नमुन्यातील अर्ज** (EX.37) निकाल घोषित झाल्यापासून पुढील १० दिवसाच्या आत महाविद्यालयामध्ये जमा करणे आवश्यक आहे. विहित नमुन्यातील अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (wcassolapur.org) उपलब्ध आहे.

**३.** अर्जावर विद्यार्थ्यांनी Seat No. (Pattern wise), PRN No, Branch, year & Actual Problem in Result (Subjectwise or Total) यांचा उल्लेख करणे व त्याबाबतचे हॉलतिकीट, लेजर यांची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे**. (विद्यार्थ्यांच्या अर्जावरील माहिती अपूर्ण असल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही.)**

४. विद्यार्थ्यांनी कार्यालयामध्ये निकालाच्या त्रुटीबाबत अर्ज दिल्यानंतर संबंधीत अर्जावर कार्यालयस्तरावरून झालेल्या कार्यवाहीबाबत १० दिवसानंतर विचारणा करावी.

५. निकाल घोषित झाल्यापासून पुढील १० दिवसात निकालासंदर्भात त्रुटीबाबत विद्यार्थ्यांने अर्ज न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल.

**६. ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण असेल अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका पात्रता पूर्ण झाल्यानंतर देण्यात येतील.**

७. **अ)** संकेतस्थळावर निकाल घोषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निकाल घोषित झाल्यापासून पुढील दहा दिवसाच्या आत उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीकरिता (Photocopy Application) अर्ज कार्यालयात शुल्कासह जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासोबत महाविदयालयाच्या संकेतस्थळावर घोषित झालेल्या निकालाची (लेजरकॉपीची) प्रत जोडणे आवश्यक आहे. **सर्व विहित नमुन्यतील अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

**ब)** १) उत्तर पत्रिका झेरॉक्स अर्ज (EX.39-Photocopy Application, निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसात) शुल्क रू. २१०/- त्यानंतर प्रती उत्तर पत्रिका रू.२००/-

२) उत्तर पत्रिका फेरतपासणी अर्ज (EX.40A&B-Verification of Answer Book, झेरॉक्स प्रत मिळाल्यानंतर दहा दिवसात) : शुल्क रू.५१०/- त्यानंतर प्रती पेपर रू.५००/-

WALCHAND COLLEGE OF ARTS & SCIENCE (AUTONOMOUS) SOLAPUR
EXAM SECTION

# परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर कार्यालयाकरिता सूचना

१. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर निकाल घोषित झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे निकाल घोषित झाले आहेत का याची खात्री करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे.

२. ज्यांचे निकाल घोषित झाले आहेत. त्यामधील काही विद्यार्थ्यांचे निकाल घोषित झाले नसतील अशा विद्यार्थ्यांची माहिती एकत्र करुन त्याची एक यादी बनवून सदरची माहिती निकाल घोषित झाल्यापासून पुढील १० दिवसात परीक्षा विभागाकडे कळविणे अनिवार्य आहे.

**३. ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण असेल अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका कार्यालयास अदा करण्यात येणार नाहीत. विद्यार्थ्यांची पात्रता पुर्ण झाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यालयाकडून तशी माहिती अपडेट झाल्यानंतरच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका कार्यालयास पाठविण्यात येतील. (गुणपत्रिका मागणी करतेवेळी कार्यालयाने विद्यार्थ्यांची पात्रता पूर्ण आहे किंवा नाही हे विद्यार्थ्यांचा Profile मध्ये तपासूनच गुणपत्रिकेची मागणी करावी.)**

४. घोषित झालेल्या निकालामध्ये ज्या विद्यार्थ्यांचे निकाल RR/ABS/Copy Case आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना याबाबत सूचना देण्याकरिता कार्यालयीन स्तरावरुन विद्यार्थ्यांसाठी परिपत्रक काढून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

५. घोषित झालेल्या निकालामध्ये RR/Abs याबद्दल असलेल्या त्रुटीबाबतचे निकाल घोषित झाल्यापासून पुढील १० दिवसापर्यंत कार्यालयाकडे विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज (EX.37) जमा करुन घेवून कार्यालयाने सर्व अर्ज पुढील ३ दिवसात परीक्षा विभागाकडे आणून जमा करणे आवश्यक आहे. **(विद्यार्थ्यांच्या अर्जावर पुढील माहिती भरणे अत्यंत आवश्यक आहे. Seat No. (Patternwise), PRN No., Branch, Year & Actual Problem in Result (Subjectwise or Total) व ही सगळी माहिती भरली असल्याचे व सोबत त्याबाबतचे हॉलतिकीट, लेजर यांची छायंकित प्रत अर्जासोबत जोडली आहे या सर्व बाबी कार्यालयाने तपासून ते अर्ज परीक्षा विभागाकडे जमा करावेत. अर्जावर माहिती अपूर्ण असल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

६. प्रचलित नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांचे निकालातील (Ordinance / ATKT/Subject Title/Subject Head/ Min, Max Passing इ.) बाबी चेक करणे आवश्यक असून यामध्ये त्रुटी अथवा दुरुस्ती असल्यास त्या परीक्षा विभागाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

७. **अ)** संकेतस्थळावर निकाल घोाषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निकाल घोषित झाल्यापासून पुढील सात दिवसाच्या आत उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीकरिता (Photocopy Application) अर्ज कार्यालयात शुल्कासह जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासोबत महाविदयालयाच्या संकेतस्थळावर घोषित झालेल्या निकालाची (लेजरकॉपीची) प्रत जोडणे आवश्यक आहे. **सर्व विहित नमुन्यतील अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

**ब)** १) उत्तर पत्रिका झेरॉक्स अर्ज (EX.39-Photocopy Application, निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसात) शुल्क रू. २१०/- त्यानंतर प्रती उत्तर पत्रिका रू.२००/-

२) उत्तर पत्रिका फेरतपासणी अर्ज (EX.40A&B-Verification of Answer Book, झेरॉक्स प्रत मिळाल्यानंतर सात दिवसात) : शुल्क रू.५१०/- त्यानंतर प्रती पेपर रू.५००/-

WALCHAND COLLEGE OF ARTS & SCIENCE (AUTONOMOUS) SOLAPUR
EXAM SECTION